क्राप/विनिसा/आस्था/शिऊ/ ७७२६
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय,
सातारा दिनांक :- ११/१२/२०२३

प्रति,

१] मा. सहाय्यक संचालक,
जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,नविन प्रशासकिय इमारत एस.टी. स्टँड पाठीमागे सातारा.-४१५००१

२] मा. अंशकालीन प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातारा, कराड.

३] मा. अंशकालीन प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था,
सातारा/कराड/कोरेगांव/पाटण/लोणंद/औंध/मेढा/वाई/फलटण/महाबळेश्वर

४] मा. प्राचार्य दौलत औदयोगिक प्रशिक्षण संस्था दौलतनगर ता. पाटण, जि. सातारा.

५] मा. प्राचार्य एस.डी.टी. आय. व्होकेशनल एज्युकेशन ॲन्ड ट्रेनिंग सेंटर सातारा.

विषय :- शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी सन २०२४ सत्राकरिता उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सुचित करणे.

महोदय,

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये सातारा विभागात सन २०२४ सत्रासाठी निरनिराळया व्यवसायात खाली दर्शविल्याप्रमाणे शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्याची आहे.

| अ.क्र | व्यवसायाचे नाव | जागांची संख्या |
|---|---|---|
| १ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | ४० |
| २ | मेकॅनिक डिझेल | ३४ |
| ३ | मोटार व्हेईकल बॉडीबिल्डर [शिटमेटल वर्कर] | ३० |
| ४ | ॲटो इलेक्ट्रिशिअन | ३० |
| ५ | वेल्डर | २ |
| ६ | टर्नर | ३ |
| ७ | प्रशितन व वातानुकुलिकरण | ६ |
| | एकुण | १४५ |

आवश्यक शैक्षणिक पात्रता, वय विद्यावेतन, इत्यादी बाबतचा तपशील सोबतच्या विहित नमुन्यातील मागणी पत्रात दिलेला आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर सदर शिकाऊ उमेदवारांस रा.प.महामंडळ, सातारा विभागात सहाय्यक पदाच्या सरळसेवा भरतीच्या वेळी सहाय्यक पदासाठी थेट अर्ज करता येईल. मात्र त्यांना महामंडळाच्या सेवेत सामावून घेण्याचे बंधन महामंडळावर राहणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

शिकाऊ उमेदवारीकरिता सन २०२१, २०२२, २०२३ या वर्षी आय.टी.आय. परिक्षा पास झालेले असावेत.

सदर प्रक्रियेत कालमर्यादा असल्याने आपल्या संस्थेतून आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या www.apprenticeshipindia.org संकेत स्थळावर आपल्या संस्थेतून आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना एम.आय.एस. वेबपोर्टलवर शिकाऊ उमेदवारीबाबत रजिस्ट्रेशन करणेबाबत सुचना देण्यात यावी. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सातारा विभागाचा आस्थापना रजिस्ट्रेशन क्र. E06162700168 असा आहे. कृपया शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणासाठी नमूद केल्याप्रमाणे सर्व अटींची

पुर्तता करणा-या उमेदवारांना दि. १३/०१/२०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याबाबत सुचना देण्यात याव्यात तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत विभाग नियंत्रक कार्यालय, ७ स्टार बिल्डिंगच्या मागे एस.टी. स्टँड जवळ, रविवार पेठ, सातारा. ४१५००१ या पत्त्यावर उमेदवारांनी समक्ष हजर राहून सकाळी १०:०० ते ०५:३० या कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

कळावे.

आपला विश्वासू

विभाग नियंत्रक
रा.प. सातारा.

सोबत : विहित नमुन्यातील माहितीचा तक्ता

| अ. क्र. | पदाचे नांव | भरावयाची पदे | शैक्षणिक अर्हता | पाठयवेतन व प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ४० | १] कमीतकमी एसएसी पास असणे आवश्यक आहे.<br>२] सरकारमान्य आयटीआय मधील २ वर्षाचा मेकॅनिक मोटार व्हेईकल कोर्स [ट्रेड] उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.८०५०.००/- [दरमहा] २ वर्ष |
| २ | मेकॅनिक डिझेल | ३४ | १] कमीत कमी एसएससी पास असणे आवश्यकआहे .<br>२] सरकारमान्य आयटीआय १ वर्षाचा मेकॅनिक डिझेल कोर्स ट्रेड उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.७७००.००/- दरमहा १ वर्ष |
| ३ | ॲटो इलेक्ट्रिशियन | ३० | १] कमीत कमी एसएससी पास असणे आवश्यकआहे .<br>२] सरकारमान्य आयटीआय २ वर्षाचा इलेक्ट्रिशियन कोर्स ट्रेड उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.८०५०.००/- दरमहा २ वर्ष |
| ४ | मोटार व्हेईकल बॉडिबिल्डर | ३० | १] इयत्ता ८ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२]सरकारमान्य आयटीआय १ वर्षाचा शिटमेटल/ ब्लॅकस्मिथ कोर्स ट्रेड उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.७७००.००/- दरमहा १ वर्ष |
| ५ | वेल्डर | २ | १] कमीत कमी एसएससी पास असणे आवश्यकआहे .<br>२] सरकारमान्य आयटीआय १ वर्षाचा वेल्डर कोर्स ट्रेड उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.७७००.००/- दरमहा १ वर्ष |
| ६ | टर्नर | ३ | १] कमीत कमी एसएसी पास असणे आवश्यक आहे.<br>२] सरकारमान्य आयटीआय मधील २ वर्षाचा टर्नर [ट्रेड] उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.८०५०.००/- [दरमहा] १ वर्ष |
| ७ | प्रशितन व वातानुकुलिकरण | ६ | १] कमीत कमी एसएससी पास असणे आवश्यकआहे .<br>२] सरकारमान्य आयटीआय १ वर्षाचा प्रशितन व वातानुकुलिकरण कोर्स ट्रेड उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | रु.७७००.००/- दरमहा १ वर्ष |